# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना
(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326
**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १५/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** आपत्ती प्राधान्य

**वाचा:-**

१. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२. सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडील अधिसुचना करोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य५/दिनांक १४/०३/२०२०.
३. मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील पत्र करोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य५/दिनांक १४/०३/२०२०.

**विषय:- नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) या विषाणुचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**आदेश**

ज्याअर्थी, राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३, व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी, मी, **रविंद्र बिनवडे, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, जालना** करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जालना जिल्हयातील सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अंगणवाड्या साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवणेबाबत याद्वारे आदेशीत करीत आहे.

उपरोक्त आदेशाचे कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने अवज्ञा केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता १८६० (४५) याच्या कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढील कारवाही करण्यात येईल.

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जालना**

प्रति,
१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास), जिल्हा परिषद, जालना यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

प्रत:
१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. उप विभागीय अधिकारी, जालना / भोकरदन / परतूर / अंबड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
४. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जालना यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
६. तहसीलदार, जालना / बदनापूर / भोकरदन / जाफ्राबाद / परतूर / मंठा / अंबड / घनसावंगी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
७. मुख्याधिकारी, नगर पालिका, जालना / भोकरदन / परतूर / अंबड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
८. मुख्याधिकारी, नगर पंचायत, बदनापूर / जाफ्राबाद / मंठा / घनसावंगी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
९. सर्व संबंधीत विभागप्रमुख, जिल्हा जालना यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.